क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/१९८ /२०२४
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. ०८/१०/२०२४

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना – सुधारणा

**विषय :–** अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.

**संदर्भ :–** १) OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८

*******

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रात दिनांक ०३/१०/२०२४ ते दिनांक १२/१०/२०२४ या कालावधीत नवरात्रोत्सव हा सण साजरा होत असून दिनांक १२/१०/२०२४ रोजी देवीमूर्ती विसर्जनाचे व मिरवणूकांचे मोठया प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. सदर सणानिमित्त जनसमुदाय रस्त्यावर असतो.

**ज्याअर्थी,** नवरात्रौत्सव सणानिमित्त मोठया संख्येने जनसमुदाय देवी विसर्जन व मिरवणुकांमध्ये सामील होणार आहे. जड – अवजड वाहतूक सुरू ठेवण्यात आली त्या दरम्यान देवी मूर्ती स्थापना किंवा विसर्जन होण्यापुर्वी काही अप्रिय घटना घडू शकते.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागातून तीन राष्ट्रीय महामार्ग व एक राज्य महामार्ग मार्गस्थ होत आहेत. नमूद महामार्गावरून बाहेरील राज्यांमध्ये जाणा–या व बाहेरील राज्यांतून येणा–या वाहनांची वाहतूक सुरू असते. जड – अवजड वाहनांमुळे ठाणे शहर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये नवरात्रौत्सव दरम्यान वाहतूक कोंडी होईल. त्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ठाणे शहर वाहतूक विभागातील अंतर्गत मार्गांवर जड – अवजड वाहनांना प्रवेश बंदी बाबत आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी,** मी आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

**प्रवेश बंद –** सर्व प्रकारच्या जड – अवजड मालवाहतूक करणा–या वाहनांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून मार्गस्थ होण्यास देवी विसर्जन/ मिरवणुक दिवशी दिनांक १२/१०/२०२४ रोजी दुपारी १४:०० ते देवी मूर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत प्रवेश बंद राहील.

**पर्यायी मार्ग–**
१) गुजरात कडून नवी मुंबई कडे जाणारी वाहने मनोर टेन नाका येथून विक्रमगड – पाली – वाडा – आबिटघर – आटगांव – शहापूर – मुरबाड – कर्जत मार्गे नवी मुंबई जे.एन.पी.टी. कडे इच्छीत स्थळी जातील.
२) नाशिक कडून नवी मुंबई कडे जाणारी वाहने शहापूर – मुरबाड – कर्जत मार्गे नवी मुंबई जे.एन.पी.टी. कडे इच्छीत स्थळी जातील.
३) मुंबई कडून येणारी जड अवजड वाहने ऐरोली टोलनाका मार्गे कर्जत – मुरबाड –शहापूर –वाडा –मनोर टेन नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील अथवा जोगेश्वर विक्रोळी लिंक रोडने पश्चिम द्रुतगती मार्गाने इच्छीत स्थळी जातील.
४) नवी मंबई कडून गुजरात किंवा नाशिक कडे जाणारी जड अवजड वाहने कर्जत – मुरबाड – शहापूर मार्गे नाशिकडे तसेच – आटगांव – आबिटघर – वाडा – पाली –विक्रमगड – मनोर टेन नाका – गुजरात मार्गे इच्छीत स्थळी जातील.

( आशुतोष डुंबरे )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेल्या वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

CamScanner

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना जारी केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेल्या वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा. सविनय सादर,**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई व मिरा भाईंदर
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा,ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ– १,२,३,४,५, ठाणे शहर

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना जारी करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CS CamScanner